NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

दिनांक २५.०५.२०२६ सोमवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २४.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ६,१००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,७९६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,२८,५५०/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगीरी :– वाहन चोरी करणाऱ्या ०३ आरोपींना अटक, १४ वाहने हस्तगत.

दिनांक १८.०४.२०२६ चे १८.३० वा. ते दिनांक २०.०४.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, कर्मयोगी अपार्टमेंट चे विरुध्द बाजूस प्रियदर्शिनी कॉलेज समोर, फुटपाथवर, बजाजनगर, नागपूर येथे फिर्यादी गौरव संजय मृगुवार वय ४५ वर्षे रा. कर्मयोगी अपार्टमेंट, यांनी त्यांची होन्डा ॲक्टीवा गाडी क्र. एमएच ४९ सीपी ३०८७ किंमती ४०,०००/–रू. ची ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद ॲक्टीवा गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपीस निष्पन्न करुन लाखनी, भंडारा येथून आरोपी नामे पियुष रविंद्र जगनाडे वय २३ वर्षे, रा. टेकेपार, लाखनी जि. भंडारा. ह.मु. बाबुलखेडा, रामेश्वरी, अजनी नागपूर यास एका विना नंबरचे ॲक्टीवा गाडीसह ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचे साथीदार नामे १) अंशुल महेश सहजारे वय २३ वर्ष रा. लाखोरी रोड, भारत गॅस गोडावून जवळ, लाखनी जि. भंडारा २) दिप कुलदीप रामटेके वय २० वर्ष रा. पाणी टाकीजवळ, लाखोरी रोड, लाखनी जि. भंडारा यांचेसह संनगमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना ताब्यात घेऊन अधिक सखोल विचारपूस केली असता त्यांनी वरील गुन्हया व्यतीरिक्त पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत –०३ वाहन चोरीचे गुन्हे, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत –०१, सोनेगाव–०१, हुडकेश्वर–०१, खापरखेडा–०१, पोलीस ठाणे बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर ग्रामिण हद्दीत

–०२, पोलीस ठाणे बोरी नागपूर ग्रामिण हद्दीत –०१ असे एकुण ११ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. वरील गुन्हयाचे वाहनाव्यतिरिक्त आरोपींचे ताब्यात बजाज पल्सर क्र. एमएच ४० एएच १८४० तसेच नवीन बुलेट क्र. पीबी ०२ एएल ४४४० या वाहनांचे गुन्हे दाखल नाहीत. तसेच आरोपींनी गुन्हा करतांना वापरलेली होंडा युनिकॉर्न क्र. एमएच ३६ एक्यु ६५५६ अशी एकूण १४ वाहने जप्त करण्यात आली.

गुन्हे शाखा, युनिट क्र. १ पोलीसांनी ०३ आरोपींना अटक करून एकुण ११ गुन्हे उघडकीस आणून त्यांचे ताब्यातुन एकुण १४ दुचाकी वाहने, ०२ मोबाईल फोन असा एकूण १३,५५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेडडी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजी राठोड, अपर पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि सचिन भोंडे, राजाभाऊ जाधवा, पोहवा. मनोज टेकाम, प्रितम यादव, सुमित गुजर, रितेश तुमडाम, स्वप्निल खोडके, कुणाल गेडाम, रविंद्र खेडकर व अजमत शेख यांनी केली.

<u>२) अजनी पोलीसांची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २५.०५.२०२६ चे ०३.५५ वा. ते ०५.०० वा. चे दरम्यान, अजनी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, सावित्रीबाई फुले नगर, गली क्र. ०६, अण्णाभाऊ साठे मार्ग, अजनी येथे राहणारा इसम नामे आदित्य भिमराव तेलगोटे वय २३ वर्ष याचे राहते घरी एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन पंचासमक्ष त्याची व घराची घरझडती घेतली असता, त्याचे ताब्यातून घराचे टेरेसवर असलेल्या प्लायवूडचे मागे एका झिपलॉक पन्नीमध्ये २९० ग्रॅम ५९ मिलीग्राम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन असा एकुण

१४,९०,९५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(क) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजी राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोनि प्रभाकर कवाळे, पोउपनि सिध्दांत म्हस्के, पोअं. मनिष भलमे, दादाजी, नरेश, मपोअं. संगिता यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नंदनवन :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, हिवरी नगर झोपडपट्टी, जयभीम चौक, मरियन पानठेल्याचे मागे, भगवानजी पोकडे यांचे घराचे समोर, नंदनवन येथे फिर्यादीचे भाऊ नामे भगवान गोविंदराव बाबुले वय ४० वर्ष व प्रदीप गोविंदराव बाबुले वय ३७ वर्ष हे दोघे वेगवेगळे त्यांचे परिवारासह राहतात. दिनांक २४.०५.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ भगवान व प्रदीप यांचेमध्ये पैसे चोरी केल्याचे कारणावरुन वाद होऊन भगवान याने प्रदीप याचे डोक्यावर लोखंडी रॉडने मारुन त्यास जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी सौ. विद्या विजय अरईकर वय ४६ वर्ष रा. प्लॉट क्र. १२२, भवानीनगर, पारडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि पंडीत शिंदे ८५५४०९१५७० यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

२) पोलीस ठाणे भांडेवाडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.०५.२०२६ चे १०.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, प्लॉट नं. ३८२, एकता नगर, गली क्र. १०, वलीशाह दर्गाहजवळ, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. प्रिया उमेश धाडसे वय २७ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन कामानिमीत्त बाहेर गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २०,०००/— रुपये व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,२४,७००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि. गंगाधर मुटकुरे ९४२२८२१६८० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

१) पोलीस ठाणे पाचपावली:— दिनांक २४.०५.२०२६ चे १९.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, दिवटे देशी भट्टीचे मागे, छत्तीसगढ रेल्वे लाईन, इलेक्ट्रीक पोल क्र. ११२९ चे बाजुला एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा गोल, उंची ५ फुट २ इंच, डोक्याचे केस काळे व लहान, दाढी मिशी बारीक, अंगात काळपट चौकडीचा शर्ट व राखाडी रंगाचा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता,

डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनाचे मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि कुणाल शेडमाके यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

२) पोलीस ठाणे इमामवाडा :– दिनांक २४.०५.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, जाटतरोडी क्र. १, डॉक्टर सोनी यांचे घराचे मागील भिंतीलगत एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट, डोक्याचे केस काळे पांढरे व लहान, दाढी मिशी बारीक, उजवे हाताचे दंडावर मॉ असे गोंदलेले आहे., अंगात पिवळया रंगाची टिशर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी वैभव राजू वाघमारे वय ३२ वर्ष रा. जाटतरोडी क्र. १, आंबेडकर पुतळयामागे, इमामवाडा, नागपूर यांचे सुचनेवरुन पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि धनराज काकडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– दिनांक २४.०५.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, दिघोरी चौक उडाणपुलाचे खाली एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, मनगटात काळे, पांढरे, भगवे रंगाचे धागे व चांदीसारखा कडा घातलेले, तसेच डोक्याला निळे, लाल काळे रंगाचा रुमाल बांधलेला, अंगात आकाशी रंगाचा फुलबाहीचा शर्ट व तपकिरी जांभळा रंगाचा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि पंकज जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.